आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 23/04/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 107 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# आयटीयन्सच्या समस्या सोडवण्यासाठी आयटी स्टडी सेल स्थापन होणार

## -आमदार शंकर जगताप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : हिंजवडी तसेच राज्यातील आयटी पार्कमधील आयटीयन्सच्या नोकरीची असुरक्षितता, 'ले-ऑफ'च्या नावाखाली होणारी पिळवणूक आणि फ्रेशर्सची वाढती फसवणूक यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी राज्य शासनाकडून एका ' आयटी स्टडी सेल'ची स्थापना केली जाणार आहे. चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी या प्रश्नी घेतलेल्या पुढाकारामुळे आता आयटीयन्सचे प्रश्न थेट मुख्यमंत्री स्तरावर पोहोचले असून, लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत यासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडणार आहे.**



आयटीयन्सच्या विविध गंभीर समस्यांबाबत कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत मंगळवारी (दि. 21 ) मंत्रालयात एक संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत आमदार शंकर जगताप यांनी आयटीयन्सया व्यथा मांडल्या. या वेळी कामगार मंत्री फुंडकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, आयटी क्षेत्रासाठी विशेष कायदे करणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तज्ज्ञांचा समावेश असलेली आयटी स्टडी सेलची स्थापना करण्याचे निर्देश दिले. या महत्त्वाच्या बैठकीला कामगार मंत्री आकाश फुंडकर, प्रधान सचिव (कामगार) आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड, अवर सचिव (कामगार-2) स्वप्निल कापडणीस, अवर सचिव (उद्योग) अजित सासुळकर, अवर सचिव (IT) योगेश गोसावी, 'फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज'चे पवनजित माने व प्रशांत पंडित, सहाय्यक कामगार आयुक्त वि. अ. नामदे आणि कक्ष अधिकारी (विधी) अश्विनी सैनी उपस्थित होते.

आमदार शंकर जगताप यावेळी म्हणाले, राज्याच्या जीडीपीमध्ये आयटी क्षेत्राचा वाटा मोठा असला, तरी येथील आयटीयन्सच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत आहे. आयटी कर्मचाऱ्यांची व्याख्या अधिक स्पष्ट करणे, त्यांना औद्योगिक विवाद अधिनियमांतर्गत संरक्षण मिळवून देणे आणि कंपन्यांकडून केल्या जाणाऱ्या ले-ऑफ थांबवण्यासाठी नियमावली तयार करण्यावर या 'स्टडी सेल'चा भर असेल. तसेच, आयटीयन्सच्या तक्रारींच्या जलद निवारणासाठी 'आयटी ट्रिब्युनल' स्थापन करण्याबाबतही चर्चा झाली.

### बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे

आयटीयन्सना निवृत्तीनंतरचे वेतन आणि नोकरी गेल्यानंतरचे लाभ मिळावेत यासाठी ईपीएफओ (EPFO) च्या माध्यमातून हस्तक्षेप करण्याचा प्रस्ताव, कंपन्यांमध्ये 'पॉश' (POSH) समिती आणि क्रंची फॅसिलिटी सुविधांची काटेकोर तपासणी, कर्मचाऱ्यांना अचानक कामावरून काढून त्यांना 'ब्लॅकलिस्टेड' करण्याच्या प्रकारावर कायदेशीर निर्बंध आणण्याबाबत चर्चा करण्यात आली. मुख्य म्हणजे आयटीयन्सच्या तक्रारींचे जलद निवारण करण्यासाठी विशेष 'आयटी ट्रिब्युनल' किंवा फास्ट ट्रॅक लेबर कोर्ट येत्या जून अखेर सुरू होण्याबाबत कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले.



“आयटीयन्सना सध्या अनेक कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. "औद्योगिक विवाद अधिनियमांतर्गत आयटीयन्सची व्याख्या स्पष्ट नसल्याने त्यांना योग्य कायदेशीर संरक्षण मिळत नाही. त्यामुळे त्यांना कामगार कायद्याच्या कक्षेत आणणे आवश्यक आहे," यासाठी उद्योग, कामगार आणि माहिती-तंत्रज्ञान या तिन्ही विभागांच्या समन्वयातून मार्ग काढण्यासाठी पावले उचलली जात आहेत. "आयटी क्षेत्र हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मात्र, आयटीयन्सच्या नोकरीची सुरक्षा आणि कायदेशीर हक्कांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. यावर आता आयटी स्टडी सेल स्थापन करण्याचे आश्वासन कामगार मंत्र्यांनी दिले आहे. मुख्यमंत्री स्तरावर बैठक घेऊन लवकरच यावर ठोस कायदेशीर तरतूद केली जाईल.”

**शंकर जगताप**, आमदार, पिंपरी चिंचवड शहर

# लघुउद्योजकांच्या मागण्यांवर महापालिकेची सकारात्मक भूमिका

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड औद्योगिक परिसरातील प्रलंबित प्रश्नांवर अखेर ठोस चर्चा घडून आली असून, लघुउद्योजकांच्या अडचणींना दिलासा देण्याच्या दृष्टीने महापालिकेने सकारात्मक पावले उचलण्याचे संकेत दिले आहेत. मंगळवार (दि. 21 एप्रिल 2026) रोजी झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटना आणि महापालिका प्रशासन आमनेसामने आले आणि विविध ज्वलंत प्रश्नांवर सखोल मंथन झाले.**



बैठकीस लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, उपाध्यक्ष संजय जगताप, संचालक संजय सातव, नवनाथ वायाळ, दिनकर साळुंखे, बक्षीरभाई तरसगार, संस्थापक अध्यक्ष तात्या सपकाळ यांच्यासह महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बंगाडे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत लघुउद्योग संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कुदळवाडी-चिखली येथील उद्योजकांचे पुनर्वसन, LBT नोटिसांचा प्रश्न, T-201 प्रकल्पातील रखडलेले गाळे वाटप, औद्योगिक भागातील खड्डेमय रस्ते, अपुरा पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, वाढत्या चोऱ्या आणि सुरक्षा यांसारख्या गंभीर मुद्द्यांचा पाढा वाचला. वाढत्या खर्च, वीजदर, कामगार टंचाई आणि थकित देयके यामुळे आधीच अडचणीत सापडलेल्या उद्योजकांवर LBT नोटिसांनी अधिकच आर्थिक ताण निर्माण केल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

महापालिकेच्या वतीने आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी या सर्व प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेत, टप्प्याटप्प्याने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. कुदळवाडी-चिखली पुनर्वसनासाठी संबंधित विभागांसह स्वतंत्र बैठक घेण्याचे, T-201 प्रकल्पातील अडथळे दूर करण्यासाठी MIDC अधिकाऱ्यांशी चर्चा करण्याचे, तसेच औद्योगिक रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाणीपुरवठा सुधारण्यासाठी तांत्रिक उपाययोजना, घनकचरा उचलण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ, पथदिवे सुरळीत ठेवण्यासाठी विशेष लक्ष, तसेच अनधिकृत भंगार दुकाने आणि चोरीच्या घटनांवर कारवाई करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले. याशिवाय PMPML बस सेवा वाढविणे, सार्वजनिक शौचालयांची उभारणी, CEPT प्लांट कार्यान्वित करणे आणि अग्निशमन केंद्रासाठी जागा उपलब्ध करण्याच्या दिशेनेही हालचाली सुरू असल्याचे सांगण्यात आले.

या बैठकीमुळे लघुउद्योजकांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या असल्या, तरी दिलेल्या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत होते, यावरच या चर्चेचे यश अवलंबून राहणार आहे. औद्योगिक विकासाचा कणा असलेल्या लघुउद्योजकांना दिलासा मिळवून देण्यासाठी प्रशासनाने आता वेगाने आणि ठोस कृती करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 23/04/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# भाजपने खोटा प्रचार बंद करावा

## स्वाती शिंदे, अध्यक्ष पुणे शहर महिला काँग्रेस

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : भारतीय जनता पक्षाने खोटा प्रचार बंद करून संसदेने 2023 साली मंजूर केलेल्या महिला आरक्षण विधेयकाची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी मागणी पुणे शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा स्वाती शिंदे यांनी केली .**




पुणे शहर महिला काँग्रेसच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिराजवळील झाशीची राणी लक्ष्मीबाई चौकात स्वाती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. भाजप हटाओ, महिला आरक्षण बचाओ., आरक्षणावर घाला घालणाऱ्या भाजप सरकारचा निषेध असो., महिला आरक्षण लागू करा, नाहीतर खुर्चा खाली करा'., आरक्षण आमच्या हक्काचं, नाही कोणाच्या बापाचे., आदी घोषणांचे फलक महिला आंदोलकांनी हातात घेतले होते.

महिला आरक्षणाचे श्रेय उपटण्याचा मोदी सरकारचा खटाटोप केविलवाणा आहे. महाराष्ट्रात महिलांना आरक्षण देण्याचा निर्णय काँग्रेस पक्षाने यापूर्वीच घेतला असून महापालिका, जिल्हा परिषदा, सहकारी संस्थांमध्ये त्याची अंमलबजावणीही झाली आहे. त्यामुळे भाजपच्या नेत्यांनी जनतेची दिशाभूल करत फिरू नये, अशा शब्दांत स्वाती शिंदे यांनी भाजप नेत्यांना खडसावले.

या आंदोलनात नगरसेविका अश्विनी लांडगे, अनिता मकवाना, प्राजक्ता जाधव, प्रियांका रणपिसे, अंजली सोलापुरे, नयना सोनार, रेखा जैन, ॲड.अंजली देसाई, कनहर आदरखान, ॲड.राजश्री दामले-चव्हाण, मनोरमा चौधरी, कल्पना शिंदे, ज्योती अडागळे, मनिषा धेंडे, ऋग्वेदी सपकाळ, सुमन हरिश्चंद्र सूर्यवंशी, पूजा सपकाळ, सुरेखा मारणे, पौर्णिमा नाईकमोडे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या.

# आरक्षण उपवर्गीकरण होईपर्यंत राज्यात मेगा भरती थांबवा,-आमदार अमित गोरखे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : अनुसूचित जाती (SC) आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा मुद्दा राज्यात सध्या तीव्र झाला आहे. या पार्श्वभूमीवर मातंग समाज आणि इतर 58 जातींच्या प्रतिनिधींनी मुंबईत एकत्र येत आपली भूमिका मांडली.**

**यावेळी आमदार अमित गोरखे यांनी राज्य सरकारकडे 'एम्पिरीकल डेटा' आणि 'न्याय्य उपवर्गीकरणा'ची मागणी केली. यावेळी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नातू आणि डॉक्टर अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे अध्यक्ष श्री. सचिनभाऊ साठे आणि लहुजी शक्ती सेना (पॉवर कमिटी) प्रदेशाध्यक्ष कैलासदादा खंदारे, तसेच लहुजी शक्ती सेनेचे नारायण गायकवाड, बीडचे आनंद सुतार, मुंबईचे राजेश मोरे, सहदेव पाटोळे, नांदेडचे आनंद देगावकर, शाहीर सुनील साठे ही सर्व राज्य भरातील प्रमुख संघटनेचे नेते उपस्थित होते.**



1 ऑगस्ट 2024 च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची अंमलबजावणी करून महाराष्ट्रात तातडीने उपवर्गीकरण लागू करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

पत्रकार परिषदेत बोलताना आमदार अमित गोरखे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा "समतेचा विचार" प्रत्यक्षात आणण्यासाठी अनुसूचित जातींमधील जे 'वंचितांतील वंचित' आहेत, त्यांना मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा मार्ग मोकळा केला आहे. अनेक राज्यांनी याची अंमलबजावणी सुरू केली असून, महाराष्ट्रातही बदर समितीचा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सादर झाला आहे. जोपर्यंत हे उपवर्गीकरण शासन जाहीर करत नाही, तोपर्यंत राज्यात कोणतीही मेगा भरती होऊ नये, अशी आमची ठाम भूमिका आहे.

ते पुढे म्हणाले की, 1991 ते 2011 च्या जनगणनेतील तफावत पाहता, शासनाने तातडीने एम्पिरीकल डेटा (Empirical Data) गोळा करून त्याचे विश्लेषण करावे व उपवर्गीकरण करताना कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही, याची काळजी घेतली जावी, मात्र जे घटक दशकांपासून सामाजिक न्यायाच्या लाभापासून दूर आहेत त्यांना त्यांचा हक्क मिळालाच पाहिजे.

### सचिनभाऊ साठे यांचे सरकारला आवाहन

लहुजी सेनेचे सचिनभाऊ साठे यांनी या मागणीला होणाऱ्या विरोधावर भाष्य केले. ते म्हणाले, हा लढा गेल्या 30-40 वर्षांपासून सुरू आहे. आज जेव्हा न्याय मिळण्याची वेळ आली आहे, तेव्हा जाणीवपूर्वक गैरसमज पसरवून सामाजिक ऐक्य धोक्यात असल्याची भीती घातली जात आहे.

हा एक 'छुपा अजेंडा' असून अनुसूचित जातींमधील 59 जातींचे ऐक्य तोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. मातंग समाज व इतर पोटजाती आजही दारिद्र्य आणि संघर्षाच्या गर्तेत अडकल्या आहेत कारण त्यांना संधी मिळत नाहीये.

शासनाने कोणत्याही दबावाला बळी न पडता या समाजांचे सर्वेक्षण करावे आणि आम्हाला न्याय द्यावा, आम्ही 58 समाजातील नागरिक या लढ्यात शासनासोबत आहोत, असे देखील यावेळी त्यांनी स्पष्ट केले.

### कैलासदादा खंदारे यांचे घटनात्मक विश्लेषण

लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलासदादा खंदारे यांनी संविधानातील तरतुदींचा हवाला देत म्हटले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या प्रस्तावनेत 'संधीची समानता' आणि 'पुरेशा प्रमाणात प्रतिनिधित्व' या शब्दांचा वापर केला आहे. पंजाबसारख्या राज्यांनी 50 वर्षांपूर्वीच उपवर्गीकरण लागू केले, मग पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्रात आजही वंचित समाज उपेक्षित का? हा केवळ एका संघटनेचा प्रश्न नसून संपूर्ण महाराष्ट्रातील दुर्लक्षित घटकांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. बदर समितीच्या अहवालाने आमचे हक्क मिळणार असून सरकारने आता विलंब लावू नये.

### प्रमुख मागण्या:

1)तातडीने उपवर्गीकरण: सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उपवर्गीकरण जाहीर करा.

2)भरतीला स्थगिती: वर्गीकरण निश्चित होईपर्यंत नवीन सरकारी भरती थांबवा.

3)एम्पिरीकल डेटा: लोकसंख्येतील मागासलेपण तपासण्यासाठी वैज्ञानिक माहिती गोळा करा.

4)न्याय्य वाटप: कोणत्याही समाजाचे नुकसान न करता आरक्षणाचे लाभ तळागाळापर्यंत पोहोचवा.

या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून मातंग समाज आणि इतर 58 जातींनी एकत्र येत सरकारला आपली शक्ती दाखवून दिली असून, लवकरच सकारात्मक निर्णयाची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# थेरगावमध्ये पिस्तूल व जिवंत काडतूसासह युवकाला काळेवाडी पोलिसांनी पकडले

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड प्रतिनिधी | यूनूस खतीब**

पिंपरी चिंचवड शहरात बेकायदा शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात सुरु असलेल्या मोहिमेत काळेवाडी पोलिसांनी थेरगाव परिसरात धडक कारवाई करत एका युवकाला पिस्तूल व जिवंत काडतूसासह अटक केली. ही कारवाई सोमवारी (दि. 21 एप्रिल) रात्री करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव रोहित दिनेश शिंदे (वय 18, रा. रमाबाई नगर, भाटनगर, पिंपरी) असे आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, थेरगाव येथील कुणाल रेसिडेन्सीच्या पाठीमागे पवार इस्टेट परिसरातील कच्च्या रस्त्यावर संशयास्पद हालचाली करणाऱ्या आरोपीची चौकशी करण्यात आली. झडती घेतली असता त्याच्याकडून एक पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले.

जप्त करण्यात आलेल्या अग्निशस्त्राची किंमत सुमारे 27 हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. विशेष म्हणजे या शस्त्रावर केंद्र शासनाच्या नियमानुसार उत्पादकाचे नाव, क्रमांक अथवा अन्य ओळख चिन्ह नव्हते.

याप्रकरणी काळेवाडी पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियम तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. काळेवाडी पोलीस पुढील तपास करत आहेत.

# दिघीत देशी बनावटीचे पिस्तूल व जिवंत काडतूसासह युवक जेरबंद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड प्रतिनिधी | यूनूस खतीब**

पिंपरी चिंचवड शहरात गुन्हेगारीवर लगाम घालण्यासाठी सुरु असलेल्या कारवाईदरम्यान दिघी पोलिसांनी मोठी कारवाई करत एका युवकाला देशी बनावटीचे पिस्तूल आणि जिवंत काडतूसासह अटक केली. ही कारवाई सोमवारी (दि. 21 एप्रिल) सायंकाळी मॅग्जिन चौक परिसरात करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव उमेश उर्फ अजय ब्रम्हणे (वय 20, रा. शास्त्रीनगर, येरवडा, पुणे) असे आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोमल इंडस्ट्रीज ते वाळके मळा जाणाऱ्या रस्त्यावर संशयास्पद हालचाली करणाऱ्या आरोपीला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याकडून एक देशी बनावटीचे पिस्तूल व एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. जप्त



मुद्देमालाची किंमत सुमारे 51 हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

सध्या शहरात लागू असलेल्या मनाई आदेशाचे उल्लंघन करून आरोपीने विनापरवाना शस्त्र जवळ बाळगल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी दिघी पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियम व महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिघी पोलीस पुढील तपास करत आहेत.

# वाकडमध्ये बंदी असलेला पान मसाला विक्रीसाठी ठेवला; पानटपरी चालकाला अटक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड प्रतिनिधी | यूनूस खतीब**

पिंपरी चिंचवड शहरातील वाकड परिसरात बंदी असलेला सुगंधित पान मसाला विक्रीसाठी ठेवल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासन आणि वाकड पोलिसांनी संयुक्त कारवाई करत पानटपरी चालकाला अटक केली. या कारवाईत हजारो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई सोमवारी (दि. 21 एप्रिल) दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास कालाखडक रोडवरील पडीत पेट्रोल पंपासमोरील रामा पान शॉप येथे



करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव रणजित राजू चौरसिया (वय 26, रा. युरो स्कूलजवळ, वाकड) असे आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीकडे केसरयुक्त विमल पान मसाला हा राज्यात बंदी असलेला तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी ठेवलेला आढळून आला.

कारवाईदरम्यान सुमारे 5 हजार 955 रुपयांचा माल जप्त करण्यात आला.

अन्न सुरक्षा कायदा, महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेचे उल्लंघन तसेच भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमान्वये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाकड पोलीस पुढील तपास करत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 23/04/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता...!



**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधूकर पवळे सभागृहात पार पडली. या सभेत शहरातील आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, स्वच्छता यासह विविध महत्त्वपूर्ण विषयांना मंजुरी देण्यात आली. यावेळी स्थायी समिती सदस्यांसह महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.**

या सभेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात आरोग्य शिबिर, भूमिपूजन, उद्घाटन, जयंती इत्यादींसाठी मंडप स्टेज व्यवस्था करणे, आकुर्डी हॉस्पिटलमध्ये फायर सेफ्टी ऑडिटनुसार अनुषंगिक कामे करणे व देखभाल-दुरुस्ती कामे करणे, मनपा कार्यक्षेत्रातील क्षेत्रीय कार्यालयांनी कचरा संकलन व अलगीकरण जनजागृती करणे व शहर कचरामुक्त करण्यासाठी जनजागृती संस्थांची नेमणूक करणे, मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी वाढावी तसेच शैक्षणिक गुणवत्ता व पटसंख्या वाढवण्यासाठी इयत्ता पहिली ते इयत्ता दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देणे, मनपाच्या विविध विभागांसाठी आवश्यकतेनुसार व मागणीनुसार 65 इंची एलईडी टीव्ही (20 नग) एक वर्ष कालावधीकरिता खरेदी करणे, प्रभाग क्रमांक 31, 32 नवी सांगवी, जुनी सांगवी येथे आवश्यकतेनुसार नवीन बोअरवेल घेणे व जुन्या बोअरवेलची देखभाल दुरुस्ती करणे, मनपाच्या चार शाळांसाठी स्मार्ट किड्स फिटनेस इक्विपमेंट साहित्य चार किट खरेदी करणे, ह क्षेत्रीय कार्यालयातील विविध प्रशासकीय इमारती, शाळा व कार्यालयांमध्ये फायर सेफ्टी ऑडिटनुसार अनुषंगिक कामे करणे व देखभाल-दुरुस्ती करणे, आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात फायर सेफ्टी ऑडिटनुसार अनुषंगिक कामे करणे व देखभाल-दुरुस्ती कामे करणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सर्व मैला शुद्धीकरण प्रकल्पांमध्ये फलक लावणे व अनुषंगिक कामे करणे, नवीन तालेरा येथे विविध विद्युत विषयक कामांसाठी कुशल कर्मचारी पुरवणे व इतर अनुषंगिक कामे करणे, रावेत येथील जगद्गुरु संत तुकाराम महाराज पुलावरून सुशोभीकरण अंतर्गत डेकोरेटिव्ह फिटिंग पोल बसविणे व अनुषंगिक विद्युत विषयक कामे करणे, मालमत्ता कर वसुलीच्या दृष्टीने व मनपा उत्पन्न वाढवण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता रेडिओ स्टेशनवरून जाहिराती प्रसिद्ध करणे, उद्यान वृक्ष संवर्धन विभागासाठी संगणक प्रणालीद्वारे कामांचे सहनियंत्रण करण्यासाठी वेब व मोबाईल आधारित संगणक प्रणाली विकसित करणे, जिजामाता पिंपरी आकुर्डी मासुळकर हॉस्पिटल येथील ईटीपी विषयक चालन, देखभाल व दुरुस्तीचे कामकाज करणे, प्रभाग क्रमांक 23 थेरगाव गावठाणमधील परिसरातील किरकोळ देखभाल-दुरुस्ती व अनुषंगिक इतर स्थापत्य विषयक कामे करणे, प्रभाग क्रमांक 27 रहाटणीमध्ये डीपी रस्त्यालगत फुटपाथ विकसित करणे व इतर ठिकाणी आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक कामे करणे, प्रभाग क्रमांक 24 थेरगाव येथे आवश्यकतेनुसार ब्लॉक फुटपाथ, डिव्हायडर व नाला-दुरुस्तीची कामे तसेच इतर स्थापत्य विषयक कामे करणे, केंद्र शासनाने नव्याने जाहीर केलेल्या स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत प्रकल्पाचे कामकाज चालवण्यासाठी एजन्सीची निवड करणे, आकुर्डी येथील कै. ह. भ. प. प्रभाकर मल्हारराव कुटे स्मृती रुग्णालयातील क्ष-किरण विभागाकरिता आवश्यक असलेली डिस्कॉम संगणक प्रणाली कार्यान्वित करणे, महानगरपालिकेचे औद्योगिक प्रशिक्षण विभागांच्या नियंत्रणाखाली असणारे आकुर्डी माध्यमिक विद्यालय येथील एमएससीआयटी केंद्राचे अद्ययावतीकरण व नूतनीकरण करणे, मनपाचे नेत्र रुग्णालय व भोसरी रुग्णालय येथे फायर ऑडिट करणे, अहवालाप्रमाणे कामे करणे व अनुषंगिक कामे करणे, क्रांतिवीर चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालय चिंचवड येथील संग्रहालयाच्या स्वच्छतेविषयी कामाकरिता दोन कर्तव्यतत्पर आरोग्य कर्मचारी यांची नेमणूक करणे, प्रभाग क्रमांक 25 येथील पुणे-बेंगलोर हायवेच्या पूर्वेकडील वाकड-पुनावळे-ताथवडे व प्रभागातील इतर परिसरातील नव्याने ताब्यात येणारे रस्ते विकसित करणे, प्रभाग क्रमांक 26 पिंपळे निलख, खुशालनगर व प्रभागातील इतर परिसरातील पावसाळी पाण्याच्या लाईनची दुरुस्तीची कामे करणे, आवश्यकतेनुसार पाइपलाइन टाकणे व इतर स्थापत्य विषयक देखभाल-दुरुस्तीची कामे करणे, प्रभाग क्रमांक 14 काळभोर नगर व इतर परिसरातील स्थापत्य विषयक कामे करणे, नेहरूनगर श्वान नियमन शस्त्रक्रिया केंद्रातील कर्मचाऱ्यांचे मानधन अदा करणे, प्रभाग क्रमांक 16 मधील रावेत, किवळे व वाल्हेकरवाडी भागातील अनधिकृत बांधकामे निष्कासित करणे व नाले साफसफाईसाठी व इतर आवश्यक कामांसाठी मशिनरी पुरविणे, प्रभाग क्र. 2 चिखलीमधील नाल्यांची साफसफाई करणे, पर्यावरण अभियांत्रिकी विभागातील मनपाच्या मैला शुद्धीकरण केंद्र तपासणी त्रयस्थ संस्थेकडून करून घेण्यासाठी संस्थेची नेमणूक करणे, सांगवी मैला शुद्धीकरण प्रकल्पाचे चालन व देखभाल-दुरुस्ती करणे, थेरगाव उपविभाग अंतर्गत प्रभाग क्रमांक 23 मध्ये विद्युत विषयक बाबींचे नूतनीकरण करणे, प्रभाग क्रमांक 11 मधील कृष्णा नगर, पूर्णा नगर, शरद नगर, शिवतेज नगर, कोयना नगर घरकुल प्रकल्प, हरगुडे वस्ती, नेवाळे वस्ती व इतर ठिकाणी आवश्यकतेनुसार जलनिस्सारण व्यवस्थेत सुधारणा करणे व नव्याने विकसित होणाऱ्या भागात जलनिस्सारण नलिका टाकणे आदी कामांना स्थायी समितीने मान्यता दिली आहे.



"शहराच्या शाश्वत विकासासाठी आणि नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आजच्या सभेत आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधांशी संबंधित अनेक प्रलंबित कामांना गती देण्यात आली आहे. विशेषतः शाळांचे सक्षमीकरण, रुग्णालयांची सुरक्षा आणि पावसाळ्यापूर्वीची नालेसफाई या विषयांना आम्ही प्राधान्य दिले आहे. पारदर्शक कारभार आणि वेळेत काम पूर्ण करणे हेच आमचे उद्दिष्ट आहे."

**अभिषेक बारणे**
(सभापती, स्थायी समिती, पिं.चिं.महापालिका)

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968